

*Anand Charitable Sanstha, Ashti's*

# Anandrao Dhonde Alias Babaji Mahavidyalaya,

**(Arts, Commerce and Science)**

*Kada, Tal. Ashti. Dist. Beed 414 202 (Maharashtra)*

# Criteria III

## 3.4.3 Extension and Outreach Programs conducted by NSS in 2019-2020


**Phone**

+02441-2396210
+91 9421404246

**Contact**

admkada@gmail.com
www.admkada.com

**Address**

Anandrao Dhonde Alias Babaji
Mahavidyalaya Kada, Taq-Ashti,
District-Beed 414 202 (M.S.)


Made with PosterMyWall.com

आनंद चॅरिटेबल संस्था, आष्टी संचलित

# आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा

## ता. आष्टी जि. बीड

# राष्ट्रीय सेवा योजना

# नियमीत शिबीर अहवाल

## २०१९-२०२०

O/C

आनंद चॅरिटेबल संस्था आष्टी, संचलित

# आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा

(कला, वाणिज्य व विज्ञान)


ता. आष्टी, जि. बीड (महाराष्ट्र) ४१४ २०२

☎ (०२४४१) २३९६२१

E-mail. : admkada@gmail.com Website : www.admkada.com




प्राचार्य : डॉ. एच्. जी. विधाते

नॅक "A" दर्जा प्राप्त ISO 9001:2008 Certification

दि. 14 / 3 /२०२०

जा.क्र. : आधोंमक / 2019-2020/334

प्रति,
मा. कार्यक्रम समन्वयक साहेब,
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद

**विषय :— नियमित शिबीर सन २०१९—२० चा अहवाल स्विकारणे बाबत.....**

महोदय,

वरील विषयी विनंती करण्यात येते की, आमच्या महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने सन २०१९—२० या शैक्षणिक वर्षामध्ये आयोजित केलेल्या नियमित शिबीराचा अहवाल आपणास सादर करीत आहोत.

तरी मे. साहेबांनी नियमित शिबीराचा अहवाल स्विकारून सहकार्य करावे.

हि नम्र विनंती.

आपला विश्वासू,

PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji College
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

<u>सोबत :—</u>
१. अहवाल
२. फोटो
३. वर्तमानपत्र बातम्याचे झेरॉक्स
४. स्वयंसेवक उपस्थितीपत्र

# आंतरराष्ट्रीय योग दिन

## अहवाल

आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालयात दि. २१.०६.२०१९ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. जी. विधाते यांच्या अध्यक्षतेखाली सकाळी ठीक ०८.०० ते ०९.३० या वेळेत घेण्यात आला. या कार्यक्रमासाठी योग प्रशिक्षक मा. प्रा. डी.वाय. चाळक संर उपस्थित होते. त्यांनी योगाचे जीवनातील महत्व सांगून तंत्रशुध्द पध्दतीने योगा व प्राणायम कसे करावेत याचे प्रात्यक्षिकातून एन.एस.एस.चे स्वयंसेवक, विद्यार्थी व महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना करवून दाखविले व प्रत्यक्ष सर्वांकडून करून घेतले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा. प्राचार्य डॉ. एच.जी. विधाते यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन एन.एस.एस. कार्यक्रमाधिकारी डॉ. आर.जी. विधाते यांनी तर आभार शारीरिक शिक्षण विभागाचे डॉ. बाळासाहेब धोंडे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी एन.एस.एस. चे कार्यक्रमाधिकारी डॉ. बी. एम. चव्हाण, प्रा. श्रीमती. शैलजा कुचेकर सह सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji College
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

# आंतरराष्ट्रीय तंबाखू विरोधी दिन व आंतरराष्ट्रीय लोकसंख्या दिन अहवाल

दि. ११ जूलै २०१९ रोजी एन.एस.एस. विभागाच्या वतीने जागतिक तंबाखू विरोधी दिन व जागतिक लोकसंख्या दिन कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. एच. जी. विधाते हे होते. प्रमुख पाहूणे म्हणून प्रा. डॉ. राम बोडखे, प्रा. डॉ. सज्जन गायकवाड, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. बी. एम. वाघुले हे उपस्थित होते. यावेळी बोलताना प्राचार्य व कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणाले की, तंबाखू ही किती घातक आहे व त्याचे दुष्परिणाम याविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण केली. तसेच डॉ. राम बोडखे यांनी विद्यार्थ्यांना शपथ दिली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सज्जन गायकवाड यांनी केले तर सूत्रसंचलन एन.एस.एस. चे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. आर. जी. विधाते यांनी तर आभार प्रा. श्रीमती. शैलेजा कुचेकर यांनी मानले. कार्यक्रमास प्रा. डॉ. बी. एम. चव्हाण, डॉ. मंडलिक, डॉ. नरसाळे, डॉ. पटेल, प्रा. कटके, डॉ. श्रीमती. टेकाडे, डॉ. श्रीमती. घुमरे, महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी, एन.एस.एस. चे स्वयंसेवक व महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थींनी उपस्थित होते.

PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji College
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

आनंद चॅरिटेबल संस्था आष्टी

आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय कडा ता. आष्टी जि. बीड

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

## वृक्षारोपन अहवाल

वृक्षारोपन व वनमहोत्सवानिमित्त महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. जी. विधाते यांनी वृक्षारोपन व वृक्षसंवर्धनाचे महत्व सांगताना असे म्हटले की, आज दुष्काळ व अवर्षणग्रस्त स्थिती निर्माण होण्याचे कारण म्हणजे मोठया प्रमाणात होत असलेली वृक्षतोड होय. त्यामुळे झाडांची संख्या कमी होऊन निसर्गाचा असमतोल निर्माण झाला. त्यामुळे काही ठिकाणी प्रचंड पाऊस तर काही ठिकाणी आजिबात पाऊस नाही. पावसाची अनियमितता त्यामुळे माणसाला अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यावर एकच उपाय म्हणून वृक्ष लागवड व वृक्षसंवर्धन काळाची गरज बनली आहे.

शासनाच्या ३ कोटी वृक्ष लागवडीचे उदिदष्ट साध्य करण्यासाठी वृक्ष लागवड पंधरवडा दि. ०१ जूलै ते १५ जूलैची रूपरेषा ठरविण्यात आली. त्यानुसार महाविद्यालयीन प्रांगणात ठिकठिकाणी ८० वृक्षांची लागवड करून त्यांच्या संवर्धनाची जबाबदारी राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांना देण्यात आली.

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. जी. विधाते यांच्या मार्गदर्शनाखाली एक दिवशीय वृक्षारोपन शिबीराचे आयोजन दि. ०६.०८.२०१९ रोजी करण्यात आले. या एक दिवशीय शिबीरामध्ये निंब, पिंपळ, करंजी इत्यादी जवळपास ८० वृक्षांची लागवड महाविद्यालय परिसरात करण्यात आली.. वृक्षारोपन पंधरवडयात एकूण १८० वृक्षांची लागवड करण्यात आली.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक एन.एस.एस. कार्यक्रमाधिकारी डॉ. बी. एम. चव्हाण यांनी केले तर आभार कार्यक्रमाधिकारी डॉ. आर.जी. विधाते यांनी मानले. याप्रसंगी एन.एस.एस. कार्यक्रमाधिकारी प्रा.श्रीमती. एस.बी. कुचेकर, प्रा.ए.बी.गाडे, प्रा. डॉ. बी. एस. खैरे, प्रा. डॉ. डी.एस. बोडखे, प्रा.डॉ.पी.एन. औटे सह महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापिका व एन.एस.एस. स्वयंसेवक मोठया प्रमाणात सहभागी होते.

Programme Officer
N.S.S. ... Mahavidyalaya,
Kada, Tal. Ashti, Dist. Beed.

PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji College
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

# रक्तदान व रक्तगट तपासणी शिबीर अहवाल

दि. ०५.०८.२०१९

अध्यक्ष: प्राचार्य डॉ. एच. जी. विधाते

प्रमुख अतिथी:
मा. प्रा.डॉ. मेजर शांतीनाथ बनसोडे
डॉ. वसंत झेंडे

सोमवार दि. ०५.०८.२०१९ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने संस्थेचे संस्थापक अध्यक्ष लोकप्रिय आमदार भीमरावजी धोंडे साहेब (आष्टी पाटोदा शिरूर) यांच्या वाढदिवसानिमित्त महाविद्यालयामध्ये रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. एच. जी. विधाते तर प्रमुख पाहुणे मा. प्रा.डॉ. मेजर शांतीनाथ बनसोडे व जनकल्याण ब्लड बॅंकेचे संचालक डॉ. वसंत झेंडे, संस्थेचे संचालक राजाबापू नलावडे, डी. फॉर्मसी कॉलेजचे प्राचार्य गदादे ए.बी., श्रीराम कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य गिन्हे बी.पी., उपप्राचार्य गांगर्डे एस.बी. हे उपस्थित होते. जनकल्याण ब्लड बॅंक अहमदनगर या ब्लड बॅंकेच्या वतीने रक्त संकलनाचे काम केले. यावेळी कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्यांनी रक्तदानाचे महत्व पटवून दिले. रक्तदानासंबंधी असणारे समज गैरसमज दुर केले. तसेच आपल्या शरीरातील हिमोग्लोबीनचे प्रमाण व रक्तगट तपासणी सर्व एन.एस.एस. स्वयंसेवकांनी मोफत करून घ्यावी असे आवाहन केले. आजच्या धावपळीच्या युगातं अपघाताचे प्रमाण वाढलेले आहे. अशा वेळी अपघात ग्रस्त रूग्णांना रक्ताची गरज भासते. तुमच्या रक्तदानामुळे कोणाचा तरी जीव वाचण्यास मदत होते. जगात नवनवीन शोध लागले गेले परंतु रक्ताचा शोध लागला नाही. रक्त हे फक्त मानवी शरीरातच तयार होते म्हणून रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. असे अध्यक्षांनी म्हटले.

रक्तदान शिबीरामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व इतर परिसरातील ४७ तरूणांनी रक्तदान केले. या कार्यक्रमाप्रसंगी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. आर.जी. विधाते यांनी केले. तर प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. बी.एम. चव्हाण यांनी केले. व कार्यक्रमाचे आभार प्रा. डॉ. बी.एस. खैरे यांनी मानले. यावेळी कार्यक्रमास मोठया प्रमाणावर एन.एस.एस. चे स्वयंसेवक, एन.एस.एस. कार्यक्रमाधिकारी प्रा. श्रीमती. शैलजा कुचेकर, महाविद्यालयाचे प्राध्यापक, प्राध्यापिका व इतर सर्व कर्मचारी तसेच जनकल्याण ब्लड बॅंक अहमदनगरचा सर्व स्टाफ व महाविद्यालयाचे विद्यार्थी मोठया प्रमाणात उपस्थित होते.

Programme Officer
N. S. S. Unit A. D. Mahavidyalaya,
Kada, Tal. Ashti, Dist. Beed.

PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji College
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

# कोल्हापूर सांगली पुरग्रस्त मदत फेरी
## अहवाल

मंगळवार दि. १३.०८.२०१९ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने कडा गावामध्ये कोल्हापूर सांगली येथील पुरग्रस्तांसाठी मदत फेरीचे अयोजन लोकनेते, रस्तेमहर्षि आमदार भीमरावजी धोंडे साहेब (आष्टी—पाटोदा—शिरूर का.) यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका, एनएसएस कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. बी. एम. चव्हाण, प्रा. डॉ, आर. जी. विधाते, प्राध्यापिका श्रीमती. एस.बी. कुचेकर आणि एनएसएस स्वयंसेवक विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठया प्रमाणात उपस्थितीत होते. फेरी आरंभ करण्यापुर्वी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. बी.एम. वाघुले व कार्यक्रम अधिकारी डॉ. बी. एम. चव्हाण यांनी स्वयंसेवकांना फेरी संदर्भात योग्य त्या सुचना देऊन मार्गदर्शन केले. यावेळी कडा बाजार कमिटी, आंबेडकर चौक, जुने बसस्थानक, ग्रामपंचायत कार्यालय, छत्रपती चौक, श्रीराम पेठ व मुख्य बाजार पेठेमध्ये फेरी काढण्यात आली होती. व्यापारी, शेतकरी, हमाल, छोटे—मोठे दुकानदार तसेच प्रतिष्ठित नागरिकांनी सढळ हाताने मदत पेटीमध्ये दान केले. पुरग्रस्त दानपेटीमध्ये एकूण ११७६०/— रूपये निधी जमा झाला. या फेरीमध्ये ११७ स्वयंसेवक सहभागी झाले होते. फेरीमध्ये गावातील लोकांबरोबरच एन.एस.एस. स्वयंसेवकांनीही आपल्या दैनंदिन खर्चामध्ये बचत करून पुरग्रस्त मदत पेटीमध्ये पैसे जमा केले.

यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका, कार्यक्रमाधिकारी डॉ. बी. एम. चव्हाण, कार्यक्रमाधिकारी डॉ. आर.जी. विधाते, कार्यक्रमाधिकारी प्रा.श्रीमती. शैलजा कुचेकर स्वयंस्फूर्तीने मदत फेरीमध्ये सहभागी झाले होते.

Programme Officer
N. S. S. Unit A. D. Mahavidyalaya,
Kada, Tal. Ashti, Dist. Beed.

Principal
Anandrao Dhonde alias Babaji College
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

# "माहिती युवादूत कार्यशाळा"

## अहवाल

दि.२२.०८.२०१९ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभाग व आनंदराव धोंडे महाविद्यालय, कडा यांच्या संयुक्त विद्यमाने माहिती युवादूत कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यक्रमासाठी मार्गदर्शक म्हणून अनुलोम सेवाभावी संस्थेचे मा. किशोर काकडे हे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना युवादूत व त्यांचे कार्य याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून रा.से. यो. कार्यक्रमाधिकारी डॉ. आर. जी. विधाते हे होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. नरसाळे डी. व्ही. यांनी तर आभार कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. भास्कर चव्हाण यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. किरण कटके यांनी विशेष परिश्रम घेतले. याप्रसंगी प्राध्यापक, प्राध्यापिका, विद्यार्थी व विद्यार्थीनी मोठया संख्येने उपस्थित होते.

PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji College
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

# "फिट इंडिया अभियान"

# अहवाल

दि. २९.०८.२०१९ रोजी फिट इंडिया अभियान हा उपक्रम महाविद्यालयात संपन्न झाला. प्रथम सकाळी ठीक ०८.५० वा. महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थीनी, प्राध्यापक व इतर कर्मचारी यांच्या उपस्थितीत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच.जी. विधाते यांनी या उपक्रमाबद्दल सविस्तर प्रास्ताविक केले. सुदृढ भारत निरोगी भारत याविषयी सविस्तर मार्गदर्शन करून सर्व स्टाफ व विद्यार्थी यांना १०००० पावले चालून या अभियानात सर्वांना सामिल करून घेतले व चालण्याचे महत्व पटवून दिले.

त्यानंतर महाविद्यालयाच्या सभागृहात राष्ट्रीय वाहिनीवरून प्रक्षेपित होणारा कार्यक्रम सर्वांनी ग्रहण केला. या कार्यक्रमासाठी स. १०.०० ते ११. २० वा. सर्व सहकारी प्राध्यापक व महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते. हा लाईव्ह कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर विद्यार्थी, विद्यार्थीनी प्राध्यापक यांना सुदृढ भारत अभियानाची शपथ दिली.

या कार्यक्रमा प्रसंगी राष्ट्रीय खेळाडू मा. बाळासाहेब शेंदूरकर हे उपस्थित होते. त्यांचा विशेष सत्कार महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आला. त्यांनी विद्यार्थी, विद्यार्थीनींना खेळाचे महत्व पटवून दिले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. आर. जी. विधाते यांनी केले तसेच कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. भास्कर चव्हाण, श्रीमती. प्रा. कुचेकर यांच्यासह सर्व प्राध्यापकांनी १०००० पावले चालण्यासाठी परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी मोठया प्रमाणावर विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते.

PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji College
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

# “राष्ट्रीय सेवा योजना वर्धापन दिन”
# अहवाल

दि. २४.०९.२०१९ रोजी **“राष्ट्रीय सेवा योजना वर्धापन दिन”** हा कार्यक्रम महाविद्यालयात संपन्न झाला. प्रथम सकाळी ठीक ११.०० वा. महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थीनी, प्राध्यापक व इतर कर्मचारी यांच्या उपस्थितीत या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. वाघुले बी. एम. यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचा स्वयंसेवक या नात्याने स्वावलंबी संस्कारक्षम नागरिक होण्याचा प्रयत्न केला पाहिजे. राष्ट्रीय आपत्तीमध्ये सहभाग घेऊन देशाची सेवा करावी असे त्यांनी विद्यार्थ्यांना आव्हान केले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे माजी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. राम बोडखे तसेच प्रा.डॉ. जी.पी. बोडखे हे उपस्थित होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.डॉ. राम बोडखे यांनी महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थीनी राष्ट्रीय सेवा योजनेत सतत भाग घेऊन, सर्वांगीण विकास साधून सामाजिक सेवाभाव जपण्याचे आव्हान केले.

या कार्यक्रमा प्रसंगी प्रा.डॉ. जी.पी. बोडखे व कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. आर.जी. विधाते यांनी विद्यार्थी, विद्यार्थीनी यांना समोयोचित मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. भास्कर चव्हाण यांनी तर सुत्रसंचलन राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक आकाश बोडखे व अश्विनी जिवे तसेच आभार शिवानी धोंडे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापिका व विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठया संख्येने उपस्थित होते.

PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji College
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

# "एड्स दिन कार्यशाळा अहवाल"

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठा अंतर्गत आनंदराव धोंडे महाविद्यालयात रेडरिबन क्लब व राष्ट्रीय सेवा योजना विभागांतर्गत एड्स जनजागृती कार्यशाळा दि. २६.०९.२०१९ रोजी घेण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्रा.डॉ. चव्हाण बी.एम. हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा एड्स प्रतिबंध अधिकारी साधना गंगावणे व प्रयोगशाळा तंत्रज्ञ जयचंद निलवाडे हे होते.

यावेळी गंगावणे यांनी विद्यार्थी, विद्यार्थीनींना एड्सची लक्षणे, उपाय व एड्स होऊच नये याविषयी मार्गदर्शन केले. याप्रसंगी कार्यक्रम अधिकारी डॉ. आर. जी. विधाते यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपात प्रा.डॉ. चव्हाण बी.एम. यांनी चारित्र्य संपन्न, संस्कारक्षम नागरिक होण्याचा प्रयत्न केला पाहिजे असे सांगून कार्यशाळेमागील उद्देश यावेळी विद्यार्थ्यांना समजावून सांगितला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. आर.जी. विधाते, सुत्रसंचलन आकाश बोडखे यांनी केले तर आभार अश्विनी जिवे हिने मानले. या कार्यक्रमासाठी प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# “संविधान दिन अहवाल”

दि.२६.११.२०१९ रोजी आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने कडा येथील बसस्थानकावर संविधान दिनाचा कार्यक्रम साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरिदास विधाते तथा व्यवस्थापन परिषद सदस्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद तसेच प्रमुख पाहुणे म्हणून बसस्थानकाचे व्यवस्थापक रमेश भोजने हे उपस्थित होते.

यावेळी अध्यक्षस्थानावरून बोलताना प्राचार्य डॉ. विधाते यांनी संविधनाचा इतिहास व संविधानाबाददल विशेष माहिती सांगून संविधानाचे जनसामाण्यांसाठी महत्व सांगताना देशातील श्रीमंत व गरीब यांचे अधिकार कसे समान आहेत हे सांगितले. आपली राज्यघटना ही धर्मनिपेक्ष आहे. सर्व जाती व धर्माच्या नागरिकांसाठी समान अधिकार आहेत हे याप्रसंगी सांगितले. तसेच राज्यघटनेतील मुलभुत अधिकार, मागदर्शक तत्वे व मुलभुत कर्तव्ये यावर सविस्तर विवेचन केले. याप्रसंगी सामुहिक संविधान उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. तसेच भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चौकातील पुतळयाला प्राचार्य डॉ. हरिदास विधाते यांचे हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक एन.एस.एस.कार्यक्रमाधिकारी डॉ. बी.एम. चव्हाण यांनी तर आभार डॉ. आर. जी. विधाते यांनी मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. बी.एम. वाघुले, सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब कर्डीले, महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थीनी तसेच प्रवासी व ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.

# “एड्स जनजागृती रॅली अहवाल”

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठा अंतर्गत आनंदराव धोंडे महाविद्यालयात रेडरिबन क्लब व राष्ट्रीय सेवा योजना विभागांतर्गत एड्स जनजागृती रॅली दि. १४.१२.२०१९ रोजी संपन्न करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. बी.एम. वाघुले हे होते. याप्रसंगी प्रमुख पाहूणे म्हणून डॉ. एकनाथ हजारे, डॉ. संभाजी ओव्हाळ, डॉ. राम बोडखे, डॉ. रवी गांजूरे, डॉ. सांडू भगत हे उपस्थित होते. याप्रसंगी अध्यक्षस्थानावरून बोलताना उपप्राचार्य डॉ. वाघुले यांनी एड्स विषयी बोलताना सांगितले की, सुंदर व्हा, हुशार व्हा, स्टायलिस व्हा पण स्वत:ला एच.आय.व्ही. पासून वाचवा असे सांगितले. एड्स विषयी बोलताना जनमाणसात जनजागृती करण्याचे काम विद्यार्थी, विद्यार्थीनी यांना करण्याचे आव्हान केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ. चव्हाण बी.एम. यांनी केले तर सुत्रसंचलन प्रा. श्रीमती. शैलेजा कुंचेकर यांनी केले. तसेच आभार प्रा.डॉ. आर.जी. विधाते यांनी मानले. या कार्यक्रमासाठी प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# “युवा दिन अहवाल”

दि. १४.०१.२०२० रोजी आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय कडा एन.एस.एस विभाग, रेडरिबन क्लब व भूगोल विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने युवा दिन कार्यक्रम साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरिदास विधाते हे होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून अहमदनगर येथील भूगर्भ अभ्यासक प्रदीप नागरगोजे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मराठवाडा प्रवक्ते शामभाऊ भोजणे, उपप्राचार्य प्रा. डॉ. बी.एम. वाघुले हे उपस्थित होते. अध्यक्षस्थानावरून मार्गदर्शन करताना नामविस्तार दिन, युवा दिन व भूगोल दिन याविषयी विद्यार्थ्यांना महत्व पटवून देवून जनजागृती निर्माण केली. युवा दिनाचे महत्व सांगताना विद्यार्थी चारित्र्य संपन्न व ध्येय साध्य करणारा युवक निर्माण झाला पाहिजे कारण स्वामी विवेकानंद यांचे विचार व सिध्दांत ही भारताची संपत्ती आहे असे सांगितले. भूगोल दिनाविषयी बोलताना प्रमुख पाहुण्यांनी पावसाचे पाणी जिरवणे किती महत्वाचे आहे हे पटवून दिले. एन.एस.एस. चे कार्यक्रमाधिकारी व रेडरिबनचे प्रा. डॉ. आर. जी. विधाते यांनी युवा दिनाविषयी समयोचित विचार मांडले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ. नासाळे डी.व्ही. यांनी व सूत्रसंचलन कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. बी.एम. चव्हाण यांनी केले तसेच आभार कार्यक्रमाधिकारी प्राध्यापिका शैलेजा कुचेकर यांनी मानले. कार्यक्रमास एन. एस.एस. चे स्वयंसेवक विद्यार्थी, प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

Programme Officer
N. S. S. Unit A. D. Mahavidyalaya
Kada. Tal. Ashti. Dist. Beed

आनंद चॅरिटेबल संस्था आष्टी

आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय कडा ता. आष्टी जि. बीड

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

## राष्ट्रीय मतदार दिवस

## अहवाल

दि. २५ जानेवारी २०२० रोजी महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना, राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभागाच्या वतीने **'राष्ट्रीय मतदार दिवस'** कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. जी. विधाते हे होते. तर प्रमुख पाहुणे प्रा.डॉ. भास्कर चव्हाण हे होते. या कार्यक्रमाच्या सुरूवातीला प्रथम अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते बाबाजींच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ. गोरे बी. डी. यांनी केले. त्यांनी मतदाना बददलची संपूर्ण पार्श्वभूमी विद्यार्थ्यांना सांगितली. तसेच उपप्राचार्य डॉ. बी.एम. वाघुले व डॉ. खैरे बी.एस. यांनी विद्यार्थ्यांना मतदान जनजागृती बददल माहिती सांगितली. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. विधाते एच.जी. असे म्हणाले की, भावी लोकशाहीची धुरा आता सर्व नवमतदारावर आहे. त्यांनी आपले नांव मतदार यादीत नोंदवावेच पण आपल्या बरोबर आपल्या गावातील इतर १८ वर्षे वयाची पूर्ण करणाऱ्या सर्व सवंगडयांची नावे मतदार यादीत समाविष्ट करण्याची जबाबदारी घ्यावी. ते पुढे म्हणाले की, आता आपली लोकशाही प्रगल्भ होत असून जुन्याची जागा नवीन तंत्रज्ञान घेत आहे. बॅलेट पेपरने मतदान करणे म्हणजे आधुनिकता सोडून पौराणिकतेकडे जाण्या सारखे आहे. तसेच त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांपैकी कोणी नांव नोंदणी केली नाही का? याचा आढावाही घेतला. चांगल्या चारित्र्याच्या कोणत्याही उमेदवाराला मतदान केले तर मतदान हे पवित्र दान ठरू शकते. कार्यक्रम प्रसंगी प्रा.डॉ. आर. जी. विधाते यांनी मतदार दिनाची विद्यार्थी व विद्यार्थीनींना शपथ दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. चव्हाण बी.एम. यांनी केले तसेच सूत्रसंचालन प्रा.डॉ. आर.जी. विधाते यांनी तर आभार प्रा. श्रीमती. कुचेकर यांनी मानले. राष्ट्रगीत घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

Programme Officer
N. S. S. Unit A. D. Mahavidyalaya
Kada, Tal. Ashti, Dist. Beed.

# “जागरूक मतदार, लोकशाहीचा आधार”

# मतदार पंधरवडा

# अहवाल

दि.२६.०१.२०२० ते १०.०२.२०२० हा मतदार पंधरवडा महाविद्यालयात साजरा करण्यात आला. दि.२६.०१.२०२० रोजी संविधान उद्देशिकेचे वाचन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. जी. विधाते यांनी करून ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहणानंतर संविधान व लोकशाही याविषयी मार्गदर्शन केले. दि. २७.०१.२०२० रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मा. प्राचार्य डॉ. एच.जी. विधाते यांच्या अध्यक्षतेखाली मतदार जनजागृती पंधरवडा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रमुख पाहुण्या मा. शारदा दळवी नायब तहसिलदार निवडणूक विभाग, आष्टी तहसिल आष्टी उपस्थित होत्या. यावेळी बोलताना शारदा दळवी यांनी सांगितले की, निवडणूक प्रक्रियेची खरी नियमावली भारताचे दिवंगत मुख्य निवडणूक आयुक्त टी.एन. शेषन यांनी करून दिली. निवडणूका निपक्ष वातावरणात व्हाव्यात म्हणून नियम व अटींचे काटेकोर पालन करण्यासाठी नियमावली राबवली. मतदान हे आपले राष्ट्रीय कर्तव्य आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदावरून बोलताना सांगितले की, मतदान करणे हा लोकशाहीचा खरा आत्मा आहे. तेंव्हा आपण मतदान केल्याने आपल्या देशाची लोकशाही बळकट व सुदृढ होण्यासाठी मदत होणार आहे. मतदाना विषयी जनमाणसांत जनजागृती करण्याचे काम विद्यार्थी व विद्यार्थीनींनी करावे असे आवाहन त्यांनी केले.

Programme Officer
N. S. S. Unit A. D. Mahavidyalaya
Kada, Tal. Ashti, Dist. Beed.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक एन.एस.एस. चे कार्यक्रमाधिकारी डॉ. बी.एम. चव्हाण यांनी केले तर सुत्रसंचलन प्रा. डॉ. रघुनाथ विधाते यांनी केले. या कार्यक्रमाचे आभार कार्यक्रमाधिकारी प्रा. श्रीमती. शैलजा कुचेकर यांनी मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थीनी, प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

दि. २८.०१.२०२० रोजी "जागरूक मतदार, लोकशाहीचा आधार" या विषयावर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. दि. ३१.०१.२०२० रोजी मतदान जनजागृती निमित्ताने काव्यवाचन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. दि. ०३.०२.२०२० रोजी वेटलॅन्ड (जागतिक आर्द्रता व जैव विविधता दिन) व लोकशाही पंधरवडा निमित्त मा. आकाश जाधव यांचे जैव विविधतेविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. दि. ०५.०२.२०२० रोजी ऑनलाईन मतदार यादी व मतदार नोंदणी विषयी मा. संदीप चिपळूणकर (जनरल मॅनेंजर एमकेसीएल) व मा. सतिष झेंडे (प्रोग्रॅम मॅनेंजर एमकेसीएल) यांनी सखोल मार्गदर्शन केले. दि. १०.०२.२०२० रोजी **भारतीय लोकशाही, निवडणूक व सुशासन'** या विषयी प्रा. डॉ. सज्जन गायकवाड यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे उपप्राचार्य मा. डॉ. बी.एम. वाघुले यांच्या अध्यक्षतेखाली मतदार पंधरवडा समारोप कार्यक्रमाचे आयोजन करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थीनी, प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

आनंद चॅरिटेबल संस्था आष्टी संचलीत

# आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा

## ता.आष्टी जि.बीड

## पहिले जागतिक वृक्ष संमेलन पालवण जि. बीड

## अहवाल

गुरुवार दि. १३/०२/२०२० ते १४/०२/२०२० या दोन दिवसीय जागतिक वृक्ष संमेलनासाठी एन.एस.एस. विभाग, आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा ता. आष्टी. गुरुवार दि. १३/०२/२०२० रोजी रा.से.यो. चे स्वयंसेवक व तीन कार्यक्रम अधिकारी असा एक संच कार्यक्रम स्थळाकडे महाविद्यालयातून रवाना झाला. सकाळी ठिक १०.३० वाजता एन.एस.एस. चे ४६ स्वयंसेवक व तीन कार्यक्रम अधिकारी असे एकूण ४९ जणांचा चमू संमेलन स्थळी पोहचला. प्रथम त्या ठिकाणी माहिती घेऊन नोंदणी करुन संमेलन परिसरात प्रवेश केला. परिसर पाहून आम्ही खूप आनंदी झालो. त्या नंतर लगेच संमेलनाचे उद्घाटन संपन्न झाले. या कार्यक्रमास मा. सयाजी शिंदे, मा. आमदार संदिप क्षीरसागर, नगराध्यक्ष मा. भारतभूषण क्षीरसागर तसेच चित्रपट कथा लेखक मा. जगताप साहेब, यांच्या प्रमूख उपस्थितीत व वडाच्या झाडाच्या अध्यक्षतेखाली उद्घाटन संपन्न झाले. त्यानंतर आमच्या महाविद्यालयाच्या एकूण ०९ विद्यार्थींनी वृक्षसुंदरी परिक्षेसाठी तयार होऊन स्पर्धेच्या ठिकाणी सहभागी झाल्या. वृक्ष सुंदरी परिक्षेनंतर जेवण करुन मग परिसर भेट व वृक्ष निगा याचे सर्वांनी अवलोकण करुन वृक्ष लागवडीसाठी रोप ताब्यात घेतले. त्या रोपाचे महाविद्यालयात रोपन करण्याचे निश्चित करुन त्या ठिकाणाहून प्रथम दिवशी निरोप घेतला. १०० किलोमीटरचा प्रवास करुन कडा येथे पोहचलो तेव्हा विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद व कुतुहल दिसून आले.

Programme Officer
N. S. S. Unit A. D. Mahavidyalaya
Kada, Tal. Ashti, Dist. Beed



प्रशिक्षक प्रा. डी. वाय. चाळक सर यांच्या मार्गदर्शनाने योगा करताना मा. प्राचार्य डॉ. एच. जी. विधाते सह स्वयंसेवक, इत्यादी



योगा दिन 21/06/2019 रोजी योगा करताना विद्यार्थी व सर्व प्राध्यापक

आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा ता.आष्टी



जागतीक तंबाखु विरोधी दिन दि. ११।०३।२०१९ रोजी तंबाखु विरोधी शपथ घेताना मा. प्राचार्य डॉ. एच. जी. विधाते. उपप्राचार्य डॉ. बी. के. वाघुले तसेच एन. एस. एस. कार्यक्रमाधीकारी



दि. ११।०३।२०१९ रोजी तंबाखु विरोधी शपथ घेताना स्वयंसेवक विद्यार्थी विद्यार्थीनी व महाविद्यालयाचा स्टाफ.

वृक्षारोपण दि. 06-08-2019



दि. 6/8/2019 रोजी वृक्षारोपन करताना मा. प्राचार्य डॉ. एच. जी. विधाते कार्यक्रमाधिकारी डॉ. भास्कर चव्हाण, प्रा. डॉ. रघुनाथ विधाते व एन. एस. एस चे स्वयंसेवक विद्यार्थी




दि. 6/8/2019 रोजी वृक्ष लागवड करताना प्रा. डॉ. बी. एस. खैरे, प्रा. डॉ. आर. जी. विधाते समवेत एन. एस. एस. चे स्वयंसेवक विद्यार्थी



दि. 05/08/2019 रोजी लोकप्रिय आमदार भीमरावजी धोंडे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान करताना प्रा.डॉ. राम बोडखे, एन.एस.एस. स्वयंसेवक प्रविण अटोळे, कार्यक्रमाधिकारी प्रा. चव्हाण प्रा.डॉ. आर.जी. विधाते ....




रक्तदान करताना रक्तदाते व रक्तदानानंतर प्रमाणपत्रासह रक्तदाते आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच.जी. विधाते एन.एस.एस. चे कार्यक्रमाधिकारी आणि स्वयंसेवक...

पुरग्रस्त मदत फेरी दि. 13/08/2019




दि. 13/08/2019 रोजी कोल्हापूर, सांगली, कऱ्हाड पुरग्रस्तांसाठी मदत फेरी मध्ये एन. एस. एस -चे कार्यक्रमाधिकारी व स्वयंसेवक--




पुरग्रस्तांना मदत करताना कडा गावातील ग्रामस्थ व एन.एस.एस. च्या स्वयंसेवीका ---




मा. किशोर काकडे (अनुलोम संस्था) मार्गदर्शन करताना



कार्यशाळेत माहिती श्रवण करताना उपस्थित विद्यार्थी-विद्यार्थिनी



रा.से.यो. वर्धापन दिन प्रसंगी आदर्श सरपंच प्रा.डॉ.राम बोरखे
मार्गदर्शन करताना




अध्यक्षीय मार्गदर्शन करताना उपप्राचार्य डॉ. बी.एफ. वाघुळे
व विद्यार्थी-विद्यार्थीनी




दि. 26/09/2019 रोजी एड्स कार्यशाळा प्रसंगी मार्गदर्शन करताना श्रीमती गंगावणे मॅडम (जिल्हा एड्स प्रतिबंध अधिकारी, बीड) मा. जयचंद जेलवाडे (प्रयोगशाळा तज्ञ, आष्टी), प्रा. डॉ. आर. जी. विधाते प्रा. डॉ. बी. एम. चव्हाण



दि. 26/09/2019 रोजी एड्स जनजागृती कार्यशाळेसाठी उपस्थित विद्यार्थी - विद्यार्थीनी




दि. 26/11/2019 रोजी बसस्टँड कडा येथे 'संविधान दिन' या कार्यक्रमाचे प्रस्ताविक करताना प्रा. डॉ. बी. एक. चव्हाण, प्रमुख उपस्थित मा. प्राचार्य डॉ. एच. जी. विधाते. व्यवस्थापक मा. भोत्रे साहेब




संविधान दिन कार्यक्रमाचे आभार व्यक्त करताना




दि. 14/12/2019 रोजी 'एड्स जनजागृती पंधरवाडा' निमित्त रेड रिबन क्लब व रा. से. यो. विभागाच्या वतीने रॅलीत घोषणा देताना




दि. 14/12/2019 रोजी एड्स जनजागृती रॅलीत विद्यार्थी-विद्यार्थीनि

(signature)




प्रमुख पाहुणे मा. प्रदिप नागरगोजे युवा दिना विषयी मार्गदर्शन करताना




युवा दिना विषयी मार्गदर्शन करताना कार्यक्रमाचे अध्यक्ष व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. जी. विधाते

**Programme Officer**
N. S. S. Unit A. D. Mahavidyalaya.




मतदार दिनाची शपथ देताना प्रा. डॉ. आर. जी. विधाते व प्रा. डॉ. बी. एन. चव्हाण, समोर विद्यार्थी शपथ घेताना...



मतदार दिनाची शपथ घेताना एन. एस. एस. चे स्वयंसेवक

**Programme Officer**
N. S. S. Unit A. D. Mahavidyalaya,
Kada, Tal. Ashti, Dist. Beed.




दि. 21-01-2020 रोजी [illegible] मतदार पंधरवाडा निमित्ताने माहिती देताना मा. शारदा दळवी (निवडणूक विभाग, नायबतहसिलदार)




मतदानाचे महत्व सांगताना कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. एच. जी. विधाते व विद्यार्थी-विद्यार्थीनी.

Programme Officer
N. S. S. Unit A. D. Mahavidyalaya




दि. 3/2/2020 रोजी मतदार पंधरवाडा व वेटलँड डे निमित्ताने मार्गदर्शन करताना मा. आकाश जाधव व सहकारी




दि. 27.1.2020 रोजी लोकशाही पंधरवाडा निमित्ताने वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. या मध्ये बोलताना विद्यार्थी वैष्णव नरवडे

Programme Officer
N. S. S. Unit A. D. Mahavidyalaya

आनंद चॅरिटेबल संस्था आष्टी संचलित

# आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा ता. आष्टी जि. बीड

# राष्ट्रीय सेवा योजना

# विशेष शिबीर अहवाल

# २०१९-२०२०

o/c

आनंद चॅरिटेबल संस्था आष्टी, संचलित

# आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा

(कला, वाणिज्य व विज्ञान)

ता. आष्टी, जि. बीड (महाराष्ट्र) ४१४ २०२

☎ (०२४४१) २३९६२१

E-mail. : admkada@gmail.com Website : www.admkada.com

नॅक "A" दर्जा प्राप्त ISO 9001:2008 Certification प्राचार्य : डॉ. एच्. जी. विधाते

जा.क्र. : आधोंमक / 2019-2020/1335 दि. 14/3/2020

प्रति,
मा. कार्यक्रम समन्वयक साहेब,
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद

**विषय :— विशेष शिबीर सन २०१९—२० चा अहवाल स्विकारणे बाबत.....**

महोदय,

वरील विषयी विनंती करण्यात येते की, आमच्या महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने सन २०१९—२० या शैक्षणिक वर्षामध्ये आयोजित केलेल्या **विशेष** शिबीराचा अहवाल आपणास सादर करीत आहोत.

तरी मे. साहेबांनी विशेष शिबीराचा अहवाल स्विकारून सहकार्य करावे.

हि नम्र विनंती.

आपला विश्वासू,

PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji College
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

**सोबत :—**
१. अहवाल
२. फोटो
३. वर्तमानपत्र बातम्याचे झेरॉक्स
४. स्वयंसेवक उपस्थितीपत्र

सत्यमेव जयते

# ग्रामपंचायत कार्यालय, सराटेवडगाव / आनंदवाडी

ता . आष्टी जि . बीड

सरपंच : प्रा . डॉ . राम बोडखे (मो नं: ९४२३०३२२२२ ) ग्रामसेवक : सायंबर . जे . डी (मो नं ९८९०...)

- प्रमाणपत्र -

दिनांक : 8/09/2020

प्रमाणीत करण्यात येते की, आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा ता. आष्टी जि. बीड यांचे 'राष्ट्रीय सेवा योजना' विभाग विशेष हिवाळी शिबीर मौजे सराटेवडगाव/आनंदवाडी ता. आष्टी जि. बीड येथे दि. 31-12-2019 ते 6-1-2020 या कालावधीत संपन्न झाले. शिबीरामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांनी सराटेवडगाव/आनंदवाडी गावात वृक्षारोपण, वृक्षांना आळी 3000 झाडांना करण्यात आली. कचरा व स्वच्छता, ग्राम स्वच्छता, पाणी अडवा, पाणी जिरवा, गावातील सांडपाणी व्यवस्था, सी.सी.टी. गॅबीयन बंधारे, माती नाला इत्यादींची दुरुस्ती व कामे केली.

त्याचबरोबर बौद्धिक कार्यक्रमामध्ये 'समृद्ध ग्राम' या विषयावर अनेक मान्यवरांची व्याख्याने घेतली. उदा. सेंद्रीय शेती, ठिबक, तुषार सिंचनाचे महत्व, वृक्षारोपणाचे महत्व इत्यादी स्वरूपाचे विद्यार्थी व ग्रामस्थांना मार्गदर्शन करण्यात आले. या राष्ट्रीय सेवा योजना शिबीरामुळे सराटेवडगाव/आनंदवाडी गावाला सत्यमेव जयते समृद्ध ग्राम 2020-21 स्पर्धेसाठी खूप मोठ्या प्रमाणात फायदा होत आहे. त्यामुळे आम्ही ग्रामस्थ आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे आभारी आहोत. तसेच त्यांच्या या कार्यक्रमामुळे प्रमाणपत्र देण्यात येते.

ग्रामसेवक
ग्रामपंचायत कार्यालय सराटेवडगांव
आनंदवाडी ता.आष्टी जि.बीड

सरपंच
ग्रामपंचायत कार्यालय सराटेवडगांव

ग्रामपंचायत कार्यालय सराटेवडगांव आनंदवाडी जि.बीड

प्रति,

मा. प्राचार्य साहेब

आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी

महाविद्यालय कडा.

विषय :- मौजे आनंदवाडी ता. आष्टी येथे सन 2017-18 चा कॅम्प आयोजित करणे बाबत.

महोदय, उपरोक्त विषयी विनंती की, आपल्या महाविद्यालयातर्फे एनएसएस चे शिबीर ग्रामिण भागात आयोजित करण्यात येते व त्यामधुन ग्रामसुधारणा, ग्रामस्वच्छता, जलसंधारण, व्यसन-मुक्ती, वृक्षारोपन अशा अनेक गोष्टींबाबत जागृती होते.

आपणास विनंती की, अशा प्रकारचा कॅम्प आमच्या गावामध्ये आयोजित करावा. आम्ही सर्व गावकरी सहभाग घेऊन कॅम्प यशस्वी करू तसेच पाच वर्षासाठी आमचे गाव दत्तक घेण्यात यावे ही विनंती या पत्राने करित आहोत.

ग्रामसेवक
ग्रा.प. जरांटेवडगाव/आनंदवाडी
ता. आष्टी जि.

सरपंच
ग्रा.प. सरांटेवडगाव/आनंदवाडी
ता. आष्टी जि. बीड

Programme Officer
N. S. S. Unit A. D. Mahavidyalaya
Kada Tal. Ashti Dist. Beed

*Anand Charitable Sanstha Ashti's*

# ANDRAO DHONDE ALIAS BABAJI MAHAVIDYALAYA, KADA

TAL. ASHTI, DIST. BEED (MS) - 414 202

Phone - 02441-239621, 239921 Fax No. 02441-239621

Email. : admkada@gmail.com Website : www.admkada.com Principal Dr. H.G. Vidhate

Ref. No. ADMK/ 2017-18/277

Date : 19 /12 /2017

प्रति,
मा. कार्यक्रम समन्वयक,
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ, औरंगाबाद

विषय :– सन २०१७–२०१८ या वर्षिचे विशेष शिबीर आयोजन करणे बाबत...

महोदय,

वरील विषयी विनंती की, सन २०१६–१७ मध्ये आमच्या महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबीर मौजे पारोडी ता. आष्टी जि. बीड येथे दि. ०६ जानेवारी २०१७ ते दि. १२ जानेवारी २०१७ या कालावधिमध्ये संपन्न झाले होते. या शैक्षणिक कालावधिमध्ये शिबीर घेण्याच्या निमित्ताने मौजे पारोडी गावास भेट दिली असता तेथील स्थानिक व राजकीय परिस्थितीमुळे सरपंच, उपसरपंच व ग्रामस्थांनी विशेष शिबीर घेण्याकरिता असमर्थता व्यक्त केली. सदर गाव दत्तक गाव म्हणून आम्ही निवडलेले होते. परंतु असमर्थता व्यक्त केल्यामुळे येथे विशेष शिबीर चालू वर्षी आयोजित करणे शक्य नाही.

आम्ही सन २०१७–१८ च्या विशेष शिबीरासाठी मौजे सराटेवडगांव ता. आष्टी जि. बीड या गावची निवड केली आहे. तेथील सरपंच, उपसरपंच व ग्रामस्थांनी शिबीरास सहकार्य करण्याची तयारी पत्राद्वारे दर्शविलेली आहे. सोबत त्या पत्राची सत्यप्रत देत आहोत. चालू वर्षी मौजे सराटेवडगांव येथे शिबीर घेण्यासाठी परिस्थिती अनुकूल आहे. तसेच चालू वर्षी पासून हेच गाव पाच वर्षासाठी दत्तक घेण्याचा आमचा मानस आहे.

तरी मे. साहेबांनी मौजे सराटेवडगांव ता. आष्टी जि. बीड येथे विशेष शिबीर घेण्यास परवानगी देऊन सहकार्य करावे.

ही नम्र विनंती.

आपला विश्वासू,

Principal
Anandrao Dhonde alias Babaji College
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

<u>सोबत :–</u>

१. ग्रामपंचायत मौजे सराटेवडगांव संमतीपत्र
२. ग्रामपंचायत मौजे पारोडी असमर्थता पत्र

20/12/2017

**Programme Officer**
N. S. S. Unit A. D. Mahavidyalaya
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

# अभिप्राय

दि. 04-01-2020

आज दिनांक 04 जानेवारी 2020 रोजी आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय कडा - ता. आष्टी जि. बीड यांच्या वतीने आयोजित रासेयो विशेष शिबीराला भेट दिली.

या सात दिवसीय शिबीरामध्ये रासेयो स्वंयसेवक यांची उपस्थिती लक्षणीय होती. "समृद्ध ग्रामासाठी युवा" या विषयावरील विशेष शिबीरात ग्रामस्वच्छता झाडांना पाणी देण्यासाठी आळे तयार करणे, बौद्धीक सत्र सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून ख-या अर्थाने समृद्ध गावासाठी हा विभाग सतत कार्यरत आहे.

'पाणी' फाऊंडेशनच्या माध्यमातून जलसंवर्धनाची काम केले असून गाव पाणीदार झाले आहे.

महाविद्यालयाने राबविलेल्या उपक्रमाबद्दल सर्वांचे कौतुक आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा. पुन्हा एकदा सर्वांचे अभिनंदन.

(सही)
प्रा. डॉ. सोपान सुरवसे
जिल्हा समन्वयक रासेयो

अध्यक्ष :→ प्री. डॉ. [illegible] (सही)

प्रमुख पाहुणे :→ 1) डॉ. राजाराम सोनटक्के (सही)
2) डॉ. रमेश शिरूडकर (सही)
3) डॉ. आर. जी. बाड्ये (सही)
4) डॉ. [illegible] डी. व्ही. (सही)

6/1/2020.

निवासी शिबीर 2019-20 चे
सराटे वडगाव या ठिकाणी व्यवस्थित
नियोजन करुन दिले आहे. वृक्षारोपण
3000 हजार झाडे लावून त्यांची जोपासना
करण्यात येत आहे. ग्रामीण स्वच्छता
करण्यात आली एकदिवसीय [illegible] चे
आयोजन व नियोजन करण्यात आले।
प्रशासन पदाधिकारी व गावकरी यांनी
सहकार्य दिलेले आहे।

पुढील कार्यासाठी शुभेच्छा।

Rpatil
6/1/2020

Dr. T. R. Patil
NSS Director
Dr BAMU

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद व

# आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा

# ता. आष्टी जि. बीड

## राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीर २०१९-२०२० अहवाल

महाविद्यालयाचे विशेष शिबीर दि. ३१/१२/२०१९ ते ०६/०१/२०२० या कालावधीमध्ये संपन्न झाले असून मंगळवार दि. ३१/१२/२०१९ रोजी शिबीराचे उद्‌घाटन संपन्न झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. एच.जी.विधाते (विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.बा.आ.म.वि. औरंगाबाद) होते. तसेच उद्‌घाटक म्हणून नायब तहसिलदार मा. प्रदिप पांडूळे हे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे मा. दत्ता काकडे (अध्यक्ष, सरपंच परिषद मुंबई, महाराष्ट्र) हे उपस्थित होते. प्रमुख उपस्थितीमध्ये दैनिक झुंजार नेताचे सहाय्यक संपादक मा. उत्तमराव बोडखे, सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन मा. राजाराम नन्नवरे, सरपंच मा.डॉ. राम बोडखे, उपसरपंच मा. महादेव शिंदे, मा. बलभीम सुंबरे, मा.बबन सुंबरे पा. यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये उद्घाटन समारंभ संपन्न झाला.

दुपारच्या सत्रामध्ये गट चर्चा घेण्यात आली. रात्री ८.३० ते १०.३० वा कविसंम्मेलन पार पडले. या मध्ये कवि प्रा. नागेश शेलार, मा. हरिष हातवटे यांनी बहारदार कविता सादर करुन रसिकांची मने जिंकली. शिबीराच्या दैनंदिनी प्रमाणे दररोज पहाटे ५.३० ते ६.३० वा. पर्यंत स्वयंस्वच्छता करुन ६.३० वा. गावातून दररोज रामधुन फेरी झाल्यांनतर लगेच योगा व प्राणायम नियमितपणे घेण्यात आले. सकाळी योगा-प्राणायमानंतर ठिक ७.३० ते ८.३० वा. या वेळेत दररोज नाष्टा दिला जात असे. सकाळी ठिक ८.३० ते १२.३० या वेळेत दररोज श्रमदान करण्यात येत होते.

बुधवार दि. ०१/०१/२०२० रोजी प्रथम ग्राम सफाई, महादेव मंदिर सफाई व कब्रस्थान सफाईचे काम करुन स्वयंसेवकांनी श्रमदान केले. यानंतर १२.३० ते १.३० स्नान आणि १.३० ते ४.०० भोजन व विश्रांती, ४.०० ते ६.३० वा प्रकल्प गट चर्चा व बौध्दीक कार्यक्रम नियमित घेतले जात असत. संध्याकाळी ६.३० ते ८.०० जेवण करुन रात्री ८ ते १० या वेळेत श्री. वाघमारे यांचे ''व्यासनाधिनता व युवक'' तसेच प्रा.डॉ.सज्जन गायकवाड यांचे ''संत गाडगेबाबा यांचे स्वच्छतेविषयीचे विचार'' या विषयावर स्वयंसेवकांना उद्‌बोधन करण्यात आले.

गुरुवार दि. ०२/०१/२०२० सकाळच्या दैनंदिनीनंतर कब्रस्थानचे उर्वरीत सफाई करण्यात आली. व रात्री ८.०० ते १०.०० वा. ''जलसंवर्धन व व्यवस्थापन (पाणी ताळेबंद)'' या विषयावर मा. राजेश बोडखे व शेख अझहर यांचे व्याख्यान झाले.

शुक्रवार दि. ०३/०१/२०२० रोजी सकाळी दैनंदिनी नंतर जानपीर माळावर ३००० वृक्ष लागवड ग्रामपंचायतच्या माध्यमातुन केलेली आहे. त्यापैकी ०३/०१/२०२० रोजी २००० वृक्षांना आळे करुन श्रमदान पूर्ण केले. तसेच रात्री ८.०० ते १०.०० या वेळेत ''वृक्ष व पाणी संवर्धन'' या विषयावर मा. कैलास पन्हाळकर यांचे व्याख्यान झाले.

शनिवार दि. ०४/०१/२०२० रोजी सकाळी ठिक १०.०० वा आष्टी ग्रामीण रुग्णालयाचे श्री. जयचंद शिवमूर्ती नलवाडे व श्रीमती सुजाता दहिफळे यांच्या मदतीने आरोग्य शिबीर व रक्त तपासणी शिबीर घेण्यात आले. या शिबीरामध्ये एकूण ९६ जणांचे रक्त व एचआयव्ही तपासणी करण्यात आली. दुपारी मा.प्रा.सोपान सुरवसे (जिल्हा समन्वय एन.एस.एस.) यांनी कॅम्पला भेट देऊन अभिप्राय दिला. रात्री ८.०० ते १०.०० या वेळेत मा. अंगत हजगुडे उस्मानाबाद यांचे ''शेंद्रीय शेती व्यवस्थापन'' या विषयावर व्याख्यान झाले.

रविवार दि. ०५/०१/२०२० रोजी सकाळच्या दैनदिनीनंतर १००० झाडांना आळे, १५० जळालेल्या ठिकाणची वृक्ष लागवड करुन संपूर्ण झाडांना पाणी देण्यासाठी केलेली १ किलोमीटर पाईपलाईन बुजवण्याचे काम पूर्ण केले. तसेच रात्री ८.०० ते १०.०० या वेळेत मा. संतोष शिनगारे (मराठवाडा विभाग प्रमुख, पाणी फौंऊडेशन) यांचे समृध्द ग्राम या विषयावर व्याख्यान झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महेश कळसाईत हे होते.

सोमवार दि. ०६/०१/२०२० रोजी सकाळी दैनंदिनी नंतर नाष्टा करुन ग्राम सफाई करण्यात आली. ग्रामसफाई नंतर स्नान व त्यानंतर समारोप समारंभाची तयारी करण्यात आली. दुपारी १२.०० वा समारोप समारंभास सुरुवात झाली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. एच.जी.विधाते हे होते. तसेच प्रमुख पाहुणे मा. प्रा.डॉ.टी.आर. पाटील (संचालक एन.एस.एस.विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद) व मा. राजेंद्र सुपेकर (तालुका कृषी अधिकारी, आष्टी) यांची प्रमुख उपस्थिती होती. मा.प्रा.टी.आर.पाटील यांनी प्रथम आगमनानंतर सात दिवशीय शिबीरामध्ये केलेल्या कामाची पहाणी केली. सर्व कामे केलेल्या ठिकाणी भेट दिली व स्वयंसेवकांनी केलेल्या कामाचे कौतुक केले.

निरोप समारंभात बोलताना त्यांनी केलेल्या कामांचे कौतुक करुन समाधान व्यक्त केले शिवाय अशा प्रकारे देशातील युवक कार्यरत झाला तर देश समृध्द होण्यास वेळ लागणार नाही. विद्यापीठाच्या सर्व स्वयंसेवकांनी देशाप्रती आपली निष्ठा जपण्याचे महान कार्य आपण करत आहात आणि हे कार्य समाजाचा दृष्टीकोन बदलण्यासाठी महत्वाचे आहे. तसेच प्राचार्य डॉ.एच.जी.विधाते अध्यक्षस्थानावरुन बोलताना स्वयंसेवक हा देशाचा आधार आहे असे सांगीतले. मा.सरपंच प्रा.डॉ.राम बोडखे, उपसरपंच मा. महादेव शिंदे, मा. संतोष शिनगारे यांनी केलेल्या कामांचे कौतुक करुन विद्यार्थ्यांना भावी जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी ग्रामस्थ व महाविद्यालयाच्या स्टाफची उपस्थिती मोठ्या प्रमाणावर होती. या शिवाय मा.प्रा.टी.आर.पाटील यांनी समाधान व्यक्त करत आपला अभिप्राय नोंदवून शिबीराबद्दल समाधान व्यक्त केले. याप्रसंगी शिबीराचे अहवाल वाचन कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.बी.एम.चव्हाण यांनी तर सुत्रसंचलन कार्यक्रमाधिकारी डॉ.आर.जी.विधाते यांनी केले व आभार कार्यक्रमाधिकारी प्रा.श्रीमती एस.बी.कुचेकर यांनी मानले व कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# समारोप समारंभ

सोमवार दि. ६/१/२०२० रोजी सकाळी ठिक १०.३० वाजता
खालील मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होत आहे.

अध्यक्ष

## मा. भीमरावजी धोंडे साहेब

(मा. आमदार, आष्टी-पाटोदा-शिरूर)

प्रमुख उपस्थिती

मा. प्रा. डॉ. टी. आर. पाटील
(संचालक, रा.से.यो. डॉ. बा.आ.म.वि.औ.बाद)

मा. उत्तमराव बोडखे
(सहाय्यक, संपादक दै. झुंजारनेता)

मा. संतोष शिनगारे
(मराठवाडा, प्रमुख पाणी फौंडेशन)

आपले विनित

डॉ. एच. जी. विधाते
(प्राचार्य)

प्रा. डॉ. राम बोडखे
(सरपंच, सराटेवडगांव/आनंदवाडी)

सौ. आयोध्या महादेव शिंदे
(उपसरपंच, सराटेवडगांव/आनंदवाडी)

प्रा. डॉ. बी. एम. चव्हाण
(कार्यक्रमाधिकारी)

प्रा. श्रीमती शैलजा कुचेकर
(कार्यक्रमाधिकारी)

प्रा. डॉ. आर. जी. विधाते
(कार्यक्रमाधिकारी)

ग्रा. पं. सदस्य :- श्री. बाळकृष्ण तरटे, श्री. नबीबशेख, सौ. छाया गजघाट, सौ. कमलाबाई गुंड, सौ. रुपाली मिसाळ, श्री. विजय बोडखे, श्री. कृष्णा बोडखे सौ. संगिता बोडखे तसेच सर्व आजी-माजी सरपंच, उपसरपंच, से.स. सो. चेअरमन, सदस्य ग्रामपंचायत सदस्य, सर्व तरुण मंडळ व ग्रामस्थ मौजे सराटेवडगांव, ता. आष्टी, जि. बीड

सर्व विद्यार्थी, प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी वृंद
आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा, जि. बीड.

*समाज सेवा हीच ईश्वर सेवा ।*

---

*खरे नाम निष्काम ही ग्रामसेवा ।*
*झटू सर्व भावे करु स्वर्ग गावा ।।*

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

# आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय

कडा, ता. आष्टी, जि. बीड-४१४ २०२
(नॅक मुल्यांकन 'अ' दर्जा प्राप्त)
यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित

## राष्ट्रीय सेवा योजना

## "समृध्द ग्रामसाठी युवा,"

## विशेष शिबीर २०१९-२०

**NOT ME - BUT YOU**

३१ डिसेंबर २०१९ ते ६ जानेवारी २०२०

स्थळ

मौजे सराटेवडगांव/आनंदवाडी, ता. आष्टी, जि. बीड

प्रति,
श्रीमान ______________________

______________________

______________________

प्रेषक

प्राचार्य डॉ. एच. जी. विधाते
आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा, ता. आष्टी, जि. बीड

*स्वच्छता ही आरोग्याची गुरु किल्ली*




दि. ३१/१२/२०१९ विशेष शिबीर उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्षीय मार्गदर्शन करताना मा. प्राचार्य डॉ. एच. जी. विधाते व्यासपीठावर उपस्थित नायबतहसिलदार मा. प्रदिप पांडुळे, मा. दत्ता काकडे (अध्यक्ष सरपंच परिषद महाराष्ट्र), मा. उत्तमराव बोडखे चेअरमन मा. राजाराम नवघरे.



विशेष शिबीरात रात्री उद्बोधन कार्यक्रमात सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्ताने अभिवादन करताना उपसरपंच सौ. अयोध्या शिंदे, व्याख्याते सह कार्यक्रम अधिकारी



प्रती दिन रामधुन फेरी सकाळी शिबीर काळात अशी पार पडत असे



शिबीर काळात दररोज रामधुन फेरी नंतर स्वयंसेवक योगा व
प्राणायाम करताना



मौजे सराटेवडगांव येथील कब्रस्तान स्वच्छता करण्याआगोदर असलेले गवत व झुडपे.



कब्रस्तान स्वच्छता (गवत निर्मूलन) करताना रा. से. यो. चे स्वयंसेवक विद्यार्थी विद्यार्थीनी व कार्यक्रम अधिकारी डॉ. चव्हाण बी. एम. प्रा. डॉ. आर. जी. विघाते व श्रीमती शैलजा कुचेकर



कब्रस्तान ची सफाई पूर्ण झाल्यानंतर एन.एस.एस. चे स्वयंसेवक



दिड एकर कब्रस्तान सफाई नंतर पहाणी करताना NSS चे जिल्हा समन्वयक मा. प्रा. डॉ. सोपान सुरवसे, आदर्श सरपंच प्रा. डॉ. राम बोडखे, डॉ. सोनटक्के, डॉ. जी. पी. बोडखे सह कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. चव्हाण, प्रा. डॉ. विख्याते



दिड एकर (60 गुंठे) कब्रस्तान परीसर स्वच्छते नंतर ~~[illegible]~~ उंचावरुन घेतलेला फोटो



शिबीर कालावधी मध्ये दि.4/1/2020 रोजी ग्रामस्थांसाठी रक्त व एच. आय. व्ही. तपासणी करताना आष्टी ग्रामीण रुग्णालयाचे मा. जैमचंद मेलवाडे व श्रीमती हरिश्चंद्र मॅडम तपासणी करताना



तीन हजार वृक्षांना आळे करताना NSS चे स्वयंसेवक



165 कि.मी. लांबीच्या पाइपलाइन बुजवण्याचे काम करताना NSS
चे स्वयंसेवक विद्यार्थी- विद्यार्थीनी



मा. टी. आर. पाटील (संचालक) विशेष शिबिरात 3000 झाडांचे केलेले आहे व गवत निर्मूलन पाहणी करताना समवेत प्राचार्य डॉ. एच. जी. विधाते, उपप्राचार्य डॉ. वाघुळे, ता. कृषी अधिकारी मा. राजेंद्र कुमकर तसेच सरपंच प्रा. डॉ. राम बोडखे



पाइपलाइन (२६ कि.मी. लांब) खुदाई पूर्ण झाल्यानंतर आनंद व्यक्त करताना एन.एस.एस.चे काही स्वयंसेवक



मौजे सरोटेवडगांव / मानंदवाडी गावचे वॉटर बजेट विद्यार्थी - विद्यार्थीनी यांना समजावून सांगतांना गावचे सरपंच मा. प्रा. डॉ. राम बोडखे



कुजवलेल्या पाईपलाइन ची पहाणी करताना [illegible]
संचालक मा. डॉ. टी. आर. पाटील सर, मा. प्राचार्य विधाते, कृषी अधिकारी
मा. कुपेकर साहेब व सरपंच प्रा. डॉ. राम बोडखे




दि. ६/१/२०२० रोजी समारोप प्रसंगी व्यासपीठावर उपस्थित मा. संचालक डॉ. टी. आर. पाटीलसर, ता. कृषी अधिकारी मा. राजेंद्र खुपेकर मा. प्राचार्य डॉ. एच जी विधातेसर, उपप्राचार्य डॉ. भगवान वाघुले तसेच सरपंच मा. डॉ. राम बोडखे, उपसरपंच मा. महादेव शिंदे

बीड-महाराष्ट्र
# झुंजार नेता
दिनांक : १ जानेवारी २०२० • वार : बुधवार • पान ३

